# सरकार तर्फे फिर्याद

धुळे शहर पोलीस स्टेशन जि.धुळे
दिनांक :- १५/०१/२०१९.

मी, सुनिल बाबासाहेब कुराडे, वय-५० वर्ष, सरकार तर्फे फिर्याद देतो की, मी दि. २८/११/२०१८ पासुन पोलीस उप अधीक्षक या पदावर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे कार्यरत आहे.

मी दिनांक १४/०१/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे कार्यालयात हजर असतांना, तक्रारदार श्री.राहुल सावता माळी, वय-४५ वर्ष, धंदा-उपशिक्षक, महानगरपालिका शाळा क्र.५६, मोहाडी उपनगर, धुळे जि.धुळे राहणार प्लॉट नं.६, सुदर्शन कॉलनी, जी.टी.पी. देवपूर, धुळे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे कार्यालयात येवुन त्यांचे स्व:हस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली, त्यातील थोडक्यात मजकुर असा की,

"यातील तक्रारदार यांची दि.१६/१२/२०१० रोजी महानगरपालिका, शाळा क्र.२८, चितोडरोड, धुळे येथे उपशिक्षक म्हणुन नियुक्ती झाली आहे. तद्नंतर महानगरपालिका शाळा क्र.६४ येथे दि.७/२/२०१८ पावेतो कार्यरत होते. त्यानंतर महानगरपालिका, शाळा क्र.५६, मोहाडी उपनगर, धुळे येथे उपशिक्षक पदावर कार्यरत आहेत. तक्रारदार हे महानगरपालिका शाळा क्र.६४, संतसेनानगर, देवपूर धुळे येथे उपशिक्षक म्हणुन कार्यरत असतांना जुन-२०१७ ते दि.०७/०२/२०१८ पावेतोचा तक्रारदार यांचा पगार १,६५,६०९/- रू. थकीत आहे. नमुद थकीत पगार मिळणेकरिता तक्रारदार यांनी मा.उपायुक्त (शिक्षण विभाग), धुळे महानगरपालिका, धुळे यांना दि.२९/१०/२०१८ रोजी अर्ज केला होता. त्याकरिता तक्रारदार यांनी वेळोवेळी महानगरपालिका, धुळे येथे मा.उपायुक्त श्री.रविंद्र जाधव यांची भेट घेतली असता, त्यांनी नमुद थकीत पगार मिळणेकरिता मान्यता देण्याकरिता १५,०००/- रू. लाचेची मागणी करीत होते. त्याचप्रमाणे तक्रारदार हे महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय, धुळे येथे गेले असता, लिपीक श्री.आनंद जाधव हे देखील तक्रारदार यांचेकडे उपायुक्त (शिक्षण विभाग) मनपा. धुळे श्री.रविंद्र जाधव यांचेकडुन नमुद १,६५,६०९/- रू. थकीत पगार मिळणेकरिता मान्यतेचे प्रक्रियेत मदत करण्यासाठी व मा.उपायुक्त श्री.रविंद्र जाधव यांची भेट घडवून, श्री.रविंद्र जाधव यांना १५,०००/- रू. लाच दयावे लागतील असे सांगत होते. परंतू तक्रारदार यांना दोन्ही लोकसेवक यांना लाच देण्याची इच्छा नव्हती. दि.१४/०१/२०१९ रोजी तक्रारदार हे महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय, धुळे येथे लिपीक श्री.आनंद जाधव यांची तसेच मा.उपायुक्त श्री.रविंद्र जाधव यांची भेट घेवुन थकीत पगार मान्यतेकरिता बोलणी करणार होते. सदर भेटी दरम्यान लिपीक श्री.आनंद जाधव व उपायुक्त श्री.रविंद्र जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशिर कारवाई करणेबाबत" लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे कार्यालयात दि.१४/०१/२०१९ रोजी लेखी तक्रार दिली होती.

तक्रारदार श्री.राहुल माळी यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आम्ही म.जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी कार्यालय, धुळे यांना दोन कर्मचारी पंच साक्षीदार म्हणुन मिळणे बाबत लेखी पत्राद्वारे विनंती केली असता, १) श्री.नितिन भगवान मासुळे, कनिष्ठ लिपीक व २) श्री.अजय भिका भावसार, कनिष्ठ लिपीक असे लेखी पत्रासह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे कार्यालयात आमचे समक्ष हजर झाले.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना सांगीतले की, दोन लोकसेवक एका तक्रारदाराकडे शासकीय कामाकरिता लाचेची मागणी करीत असुन, त्याबाबत तक्रारदाराने लेखी तक्रार दिली

-6
3011/2019
...लाचार प्रतिबंध ...धन) अधिनियम ...2018 चे कलम- ...प्रमाणे

...डा.ई.मं.वे... ...०६
१५/१/२०१९
...लीस ठाणे अंमलदार
...े शहर पोलीस स्टेशन

Scanned by CamScanner

आहे. त्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.१४/०१/२०१९ रोजी पडताळणी करण्यात येणार असुन पडताळणी कारवाई करीता पंच म्हणुन हजर राहण्याची विनंती केली असता त्यांनी पंच म्हणुन हजर राहण्यास अनुमती दिली. आम्ही दोन्ही पंचांना तक्रारदार यांची ओळख करुन दिली. दोन्ही पंचांनी तक्रारदार यांचेकडे, त्यांचे तक्रारी बाबत तोंडी विचारणा केली. आम्ही दोन्ही पंचांना तक्रारदार यांनी आमच्याकडे दिलेली लेखी तक्रार वाचण्यास दिली. सदर तक्रारीवर दोन्ही पंचांनी व आम्ही स्वाक्षरी केल्या.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंच व तक्रारदार यांना पडताळणी कारवाई बाबत योग्य त्या सुचना दिल्या. ला.प्र.वि.धुळे कार्यालयातुन तक्रारदार राहुल माळी व पंच नं.१ श्री.नितिन मासुळे यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह झाशी राणी चौकातील महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय, धुळे येथे लिपीक आनंद जाधव व उपायुक्त रविंद्र जाधव यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांचे मोटार सायकलीने रवाना केले असता, तक्रारदार व लिपीक आनंद जाधव यांची भेट झाली. सदर भेटी दरम्यान लिपीक आनंद जाधव व तक्रारदार यांची तक्रारदार यांचे थकीत पगार संदर्भात चर्चा होवून लिपीक आनंद जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे १५,०००/- रू. लाचेची मागणी करुन, सदर लाचेची रक्कम दुपारी १४.३० वा. महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय, धुळे येथे आणुन देणेबाबत सांगीतल्याचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये फाईल नं.००१ मध्ये ध्वनीमुद्रीत झालेल्या संभाषणावरुन खात्री झाल्याने तसा सविस्तर पडताळणी पंचनामा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे कार्यालयात पुर्ण करण्यात आला आहे.

त्यानंतर तक्रारदार यांनी लाच कामी दयावयाचे १५,०००/- रु. हजर केले. त्यात २,०००/-रु. दराच्या चार व ५००/- रू. दराच्या चौदा चलनी नोटा होत्या. ला.प्र.वि.धुळे कार्यालयात तक्रारदार व दोन्ही पंचांना अॅन्थ्रासिन पावडर व अॅल्ट्राव्हाईलेट दिव्याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना तक्रारदार व पंचा समक्ष पोना.कैलास जोहरे यांनी अॅन्थ्रासिन पावडर लावुन तक्रारदार यांचे पॅन्टचे डावे बाजुकडील खिशात ठेवुन दिल्या. आम्ही, दोन्ही पंच, तक्रारदार व सापळा कारवाईतील अधिकारी व कर्मचारी यांना सापळा कारवाईच्या योग्य त्या सुचना देवुन सापळा कारवाईचे आयोजन केले. तसा सविस्तर सापळापुर्व पंचनामा ला.प्र.वि. धुळे कार्यालयात पुर्ण करण्यात आला.

त्यानंतर ला.प्र.वि.धुळे कार्यालयातुन तक्रारदार राहुल माळी व पंच नं.१ श्री.नितिन मासुळे यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह झाशी राणी चौकातील महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय, धुळे येथे लिपीक आनंद जाधव व उपायुक्त रविंद्र जाधव यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांचे मोटार सायकलीने रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं.२ श्री.अजय भावसार, सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी असे जावुन कार्यालयाचे आवारात व आजुबाजूस तक्रारदार व पंच नं.१ श्री.मासुळे यांचेवर लक्ष ठेवुन लोकांच्या गर्दीत दबा धरून थांबुन राहीलो. मात्र तक्रारदार हे लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा न करताच लाप्रवि. कार्यालयात परत गेले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं.२ श्री.भावसार, सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी असे आलो. तक्रारदार व पंच नं.१ श्री.मासुळे यांनी कथन केलेली हकीगत व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये फाईल नं.००१ मध्ये ध्वनीमुद्रीत झालेल्या संभाषणावरुन लिपीक आनंद जाधव यांनी तक्रारदार यांना १५.३० वाजेनंतर साहेब आल्यावर लाचेची रक्कम घेवुन बोलविल्याची खात्री झाल्याने तसा सविस्तर सापळा पंचनामा ला.प्र.वि. धुळे कार्यालयात पुर्ण करण्यात आला आहे.

त्यानंतर ला.प्र.वि.धुळे कार्यालयातुन तक्रारदार राहुल माळी व पंच नं.१ श्री.नितिन मासुळे यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह झाशी राणी चौकातील महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय, धुळे येथे लिपीक आनंद जाधव व उपायुक्त रविंद्र जाधव यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांचे मोटार सायकलीने रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं.२

Scanned by CamScanner

श्री.अजय भावसार, सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी असे जावुन तक्रारदार व पंच नं. १ श्री.मासुळे यांचेवर लक्ष ठेवुन महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालयाचे आवारात व आजुबाजूस लोकांच्या गर्दीत दबा धरून थांबुन राहीलो. बऱ्याच कालावधीनंतर तक्रारदार व पंच नं.१ श्री.मासुळे एका मोटार सायकलने तसेच एक इसम दुसऱ्या मोटार सायकलीने असे दोन वेगवेगळया मोटार सायकलींनी झाशी राणी चौक मार्गे, अग्रवाल भवन, शिवाजी रोडने, गणपती मंदीराजवळील अग्निशामक दल कार्यालयाजवळ जावुन थांबले. आम्ही देखील त्यांचे पाठोपाठ गेलो. तक्रारदार, पंच नं.१ श्री.मासुळे व एक इसम असे अग्निशामक दल कार्यालयाचे वरील मजल्यावरील एक रूममध्ये गेले. आम्ही, पंच नं.२ श्री.भावसार, सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी असे अग्निशामक दल कार्यालय समोर व आजुबाजूस तक्रारदार व पंच नं.१ श्री.मासुळे यांचेवर लक्ष ठेवुन दबा धरून थांबुन राहीलो.

थोडयाच वेळात तक्रारदार हे अग्निशामक दल कार्यालयाचे वरील मजल्यावरील पॅसेजमध्ये येवुन तक्रारदार यांनी त्यांचे उजवे हाताने हातरूमालाने तोंड पुसण्याचा लाच स्विकारल्याचा पुर्व नियोजीत इशारा केला. सदर इशारा मिळताच आम्ही, पंच नं.२ श्री. भावसार, सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी असे सक्रीय होवुन, तक्रारदार व पंच नं.१ श्री.मासुळे यांचेजवळ आलो. सदर ठिकाणी तक्रारदार व पंच नं.१ श्री.मासुळे यांनी दाखविलेल्या तक्रारदार यांचेसोबत आलेल्या इसमाचे आमचे सुचनेवरून पोना.संदीप सरग व पोना.शरद काटके यांनी अनुक्रमे उजवा व डावा हात मनगटापासुन पकडुन अटकावुन ठेवले. तसेच खुर्चीवर बसलेल्या इसमाचे आमचे सुचनेवरून पोना.कृष्णकांत वाडीले व पोना. प्रकाश सोनार यांनी अनुक्रमे उजवा व डावा हात मनगटापासुन पकडुन अटकावुन ठेवले. त्याच दरम्यान पोकॉ.प्रशांत चौधरी यांनी तक्रारदार यांचे बनियनचे आतील बाजुस कापडी पिशवीत ठेवलेला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून तो बंद करून स्वतःचे ताब्यात घेतला, त्यावेळी २०.१३ वाजले होते.

त्यानंतर अटकाविलेल्या स्थितीतील (१) तक्रारदार यांचेसमोर खुर्चीवर बसलेले इसमास त्यांचे नाव गाव विचारता, त्यांनी त्यांचे नाव रविंद्र शेषराव जाधव, वय-५१ वर्ष, उपायुक्त (शिक्षण विभाग), महानगरपालिका, धुळे वर्ग-१ हल्ली रा.महानगरपालिका अग्निशामक दल कार्यालयाचे पहिल्या मजल्यावर, गणपतीमंदीराजवळ, धुळे कायमचा पत्ता २०४, कोस्टा मॅपल, पिर बाजार, उस्मानपुरा औरंगाबाद असे सांगितले. त्यानंतर (२) तक्रारदार यांचेसोबत आलेल्या इसमाचे नाव गाव विचारता, त्यांनी त्यांचे नाव आनंद बापुराव जाधव, वय-५४ वर्ष, लिपीक महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय, धुळे वर्ग-३ राहणार १०७, शांतीनगर, मार्केटयार्ड, धुळे असे सांगीतले.

आम्ही तक्रारदार व पंच नं.१ श्री.मासुळे यांना हकीगत विचारता त्यांनी केलेले कथन व यशस्वी सापळा कारवाईतील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील संभाषणानुसार तक्रारदार श्री. माळी, पंच नं.१ श्री.मासुळे व लिपीक आनंद जाधव असे महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालयातुन निघुन गणपती मंदीरामागील अग्निशामक दलाचे कार्यालयाचे पहिल्या मजल्यावरील उपायुक्त रविंद्र जाधव यांचे निवासस्थानात गेले. तेथे तक्रारदार, उपायुक्त रविंद्र जाधव व लिपीक आनंद जाधव यांचेत तक्रारदार यांचे थकीत पगारासंदर्भात चर्चा होवुन, उपायुक्त रविंद्र जाधव यांनी त्यांचे उजवे हाताचे इशाराने तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली असता, तक्रारदार यांनी त्यांचे पॅन्टचे डावे खिशातुन १५,०००/- रू. लाचेची रक्कम काढुन उपायुक्त रविंद्र जाधव यांचे समोर धरली असता, उपायुक्त रविंद्र जाधव यांनी तक्रारदार यांचेकडुन १५,०००/- रू. लाचेची रक्कम उजवे हाताने स्विकारून, दोन्ही हातांनी मोजुन त्यांचे जॅकेटचे उजवे खिशात ठेवुन घेतली आहे.

आमचे सुचनेवरुन पंच नं.२ श्री.भावसार यांनी लोकसेवक उपायुक्त रविंद्र जाधव यांचे जॅकेटचे उजवे खिशातुन लाचेची रक्कम काढुन मोजली असता, त्यात एकुण १५,०००/-

Scanned by CamScanner

रु. असुन त्यात २,०००/- रु. दराच्या चार आणि ५००/- रू. दराच्या चौदा चलनी नोटा होत्या. सदर नोटांचे क्रमांक हे सापळा पुर्व पंचनाम्यात नमुद असलेल्या नोटांच्या क्रमांकाशी पडताळुन पाहिले असता, ते एकच असल्याची खात्री झाली आहे.

लोकसेवक उपायुक्त रविंद्र जाधव यांचे दोन्ही हाताचे दहाही बोटांचे पेऱ्यावर व तळव्यांवर तसेच जॅकेटचे उजवे खिशाचे आत व कडांना त्याचप्रमाणे लोकसेवक उपायुक्त रविंद्र जाधव यांनी स्विकारलेल्या लाचेच्या नोटांवर दोन्ही बाजुस क्रॉस आकाराची अॅन्थ्रासिन पावडरची फिकट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली आहे. तसेच तक्रारदार यांचे डावे हाताचे पाचही बोटांचे पेऱ्यावर व तळव्यावर तसेच पॅन्टचे समोरील डावे बाजुचे खिश्याचे कडांवर व आतील बाजुस ठिकठिकाणी अॅन्थ्रासिन पावडरची फिकट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली आहे.

लोकसेवक उपायुक्त रविंद्र जाधव व लिपीक आनंद जाधव यांनी लाचे संदर्भात स्वेच्छेने स्व:हस्ताक्षरात पंचासमक्ष त्यांचे निवेदन लिहुन दिले आहे. तसा सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा क्र.१ ला.प्र.वि. धुळे कार्यालयात पुर्ण करण्यात आला आहे.

तरी तक्रारदार श्री.राहुल सावता माळी, उपशिक्षक यांचा महानगरपालिका शाळा क्र. ६४, संतसेनानगर, देवपूर धुळे येथील जुन-२०१७ ते दि.०७/०२/२०१८ पावेतोचा थकीत पगार १,६५,६०९/- रू. अदा करण्याचे मान्यतेकरिता लोकसेवक रविंद्र शेषराव जाधव, उपायुक्त (शिक्षण विभाग), महानगरपालिका, धुळे यांनी तक्रारदार श्री.माळी यांचेकडुन दि.१४/१/२०१९ रोजी गणपती मंदीराजवळील महानगरपालिका अग्निशामक दल कार्यालयाचे पहिल्या मजल्यावरील उपायुक्त रविंद्र जाधव यांचे निवासस्थानी पंच साक्षीदार समक्ष १५,०००/- रू. लाच स्विकारल्यानंतर रंगेहात पकडण्यात आले आहे. त्याचप्रमाणे तक्रारदार यांचे नमुद थकीत पगार मिळणेकामी लोकसेवक आनंद बापुराव जाधव, लिपीक महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय, धुळे यांनी तक्रारदार यांचे थकीत पगार मान्यतेचे प्रक्रियेत तक्रारदार यांना मदत करण्यासाठी उपायुक्त रविंद्र जाधव यांचेकरिता १५,०००/- रू. लाचेची मागणी करून, तक्रारदार व उपायुक्त रविंद्र जाधव यांची भेट घडवुन देवून उपायुक्त रविंद्र जाधव यांना तक्रारदार यांचेकडुन लाच स्विकारण्याकरिता सहकार्य केले आहे.

अशा प्रकारे लोकसेवक (१) रविंद्र जाधव, उपायुक्त (शिक्षण विभाग) महानगरपालिका, धुळे व (२) आनंद जाधव, लिपीक, महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय, धुळे यांनी स्वत:चे आर्थिक फायदयासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरूपयोग केला म्हणुन त्यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध (संशोधन) अधिनियम सन २०१८ चे कलम ७ प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

ही फिर्याद दिली सही,
दि. १५/०१/२०१९

समक्ष

(सुनिल बा.कुराडे)
पोलीस उप.अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे

पोलीस ठाणे अंमलदार
धुळे शहर पोलीस स्टेशन

Scanned by CamScanner